हिंदु विवाह अर्ज क्र.१/२०१८
गजेंद्र -वि- रेखा
MHBU12000001-2016

# नि.क्र. ११ वर आदेश

जाबदार हिने प्रस्तुतचा अर्ज लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. जाबदार हिचे कथनानुसार तिने दिनांक २९.६.२०१८ रोजी अर्ज दाखल केला होता. परंतु सदरील अर्ज हा नामंजुर झाला आहे. तिला लेखी जबाब देण्याकरीता विलंब झालेला आहे. जाबदार हिस जबाब दाखल करण्याची संधी मिळावी या करीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार याने म्हणणे देवुन सदर अर्जास तीव्र विरोध दर्शवीला आहे. जाबदार हिचे कथनानुसार अर्जदार याने दिलेले कारण योग्य व पुरेसे नाहीत व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

२. अर्जदार व जाबदार यांचे विधीज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद मी ऐकला आहे.

३. अर्जदार याने प्रस्तुतचा मुळ अर्ज हिंदु विवाह कायदयाचे कलम ११ नुसार दाखल केला आहे. जाबदार हिने या प्रकरणी म्हणणे देण्यास विलंबा करीता तिच्या वैयक्तीक अडचणींचा आधार घेतलेला आहे. मात्र प्रकरण व त्यामधील पक्षकारांचे हितसंबंध पाहता मला संबंधीत अर्जदार हिस एक संधी देणे योग्य वाटते. सबब मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. जाबदार हिचा लेखी जबाब प्रकरणात समावीष्ट करण्यात यावा.

मलकापुर
दिनांक १२.०९.२०१८

( अभिजीत रा. सोलापुरे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मलकापुर

I affirm that the contents of this PDF file order as correct word to word as per the original order.
Name of the Court: Civil Judge Senior Division,Malkapur.
Name of the Steno: P. D. Joshi
Date: 12.09.2018.